भुजबळ नॉलेज सिटी : अर्पण व्याख्यानमाला संपन्न

मेट्स भुजबळ नॉलेज सिटी, इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या अर्पण व्याख्यानमाला २०१९ च्या पहिल्या पर्वाची सुरुवात दिनांक ११ ऑक्टोबर रोजी झाली.

महात्मा गांधी यांनी एकोणीसाव्या शतकात केलेले समाजकार्य आणि त्यांचे विचार आजच्या समाजातील तरुणासाठी आजही आदर्श आणि अनुकरणीय आहे तसेच महात्मा गांधीनी मांडलेले विचार आजही कश्याप्रकारे उपयुक्त आहे याविषयी श्री. जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अर्पण व्याख्यान मालेतील दुसऱ्या पर्वातील पहिले पुष्प श्री. सचिन उषा विलास जोशी यांनी गुंफले. विचार कसा करावा via मोहन टू महात्मा" या व्याख्याने प्रा. जोशींनी यांनी महात्मा गांधींच्या आयुष्यातील अनेक पैलू विद्यार्थ्यांसमोर उलगडले आणि गांधीजी हे सर्वार्थाने राष्ट्रपिता का आहेत हे पटवून दिले.

जगातील सर्वात नकारत्मक व्यक्ती मोहनदास करमचंद गांधी आणि सर्व जगातील सकारत्मक व्यक्ती ही महात्मा गांधी त्यांनी स्वतःला कसे घडवले केवळ आतील सकारात्मक विचारांनी स्वतः मध्ये कशा प्रकारे बदल आणला याचे अनेक उदाहरण दिले.

आपण स्वतःला आतून जसे समजतो तसेच दिवसेंदिवस घडत जातो असे सांगत, विद्यार्थांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व आजच्या काळात कसे घडवावे या वर ते बोलले. फेसबुक इतर सोशल मिडिया माध्यम आजच्या पिढीचा आत्मविश्वास, प्रमाणिकपणा कमी करण्याचे माध्यम ठरत असल्याने त्याचा वापर कुठे, कधी आणि किती करावा हे त्यांनी स्वतः ठरवावे. हिरा जसा मौल्यवान असतो, तसेच आपणही त्यामुळे आपले व्यक्तीमत्त्वही त्याच प्रमाणे घडवावे, ज्यागोष्टीत आपणा पारंगत आहोत त्याचा सातत्याने अभ्यास करत राहावा त्यामुळे हिरा जसा चमकतो तसे आपले व्यक्तिमत्त्व चमकायला वेळ लागत नाही.

अर्पण २०१९ या व्याख्यानमालेच आयोजन महाविद्यालयाचे विश्वस्थ तसेच प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. पवन उदावंत यांनी केले भुजबळ नॉलेज सिटीतील सर्व अधिकारी, विभागप्रमुख शिक्षक आणि इतर कार्माच्यारांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर व्याख्यानमालेस मोठ्यासंख्येने विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

Summary: Young Educationist of Nashik and a renown speaker Mr. Sachin joshi narrated the life journey of Mahatma Gandhi and explained the importance of right attitude towards the life by narrating important transformation in the life of Mahatam Ganhiji in his speech titled "Journey from Mohandas to Mahatma"


HE MAN
AUGHT US
BEAUTIFUL,
ETHER.
andhiJayanti

